भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १६०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०३/२०१७

१) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ केली व चाकुने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :-

दिनांक २८/०२/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी यादवराव एकनाथ ठाकरे वय ६० वर्ष रा. आसोला हा आपले घरा समोर ऊभा असतांना यातील आरोपीने फिर्यादीस व त्याच्या परिवारास माझ्या घरा शेजारी भिंती लगत काळया कशाला ठेवता असे बोलुन शिवीगाळ करीत असल्याने फिर्यादीने उदया काळया हटवितो शिवीगाळ करुन नको शिवीगाळ कशाला करतोस असे हटकले असता आरोपीने फिर्यादीचे पोटावर चाकु सारख्या वस्तुने मारुन पोटाचे डावे बाजुला जखम झाल्याने जखमी फिर्यादी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयरे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

२) ट्रॅक्टर चालकाने मागेहुन बोलेरा गाडीला धडक देवुन एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक ०४/०३/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी राजहंस भाऊरावजी नवले वय ३७ वर्ष, रा. प्लॉट नं. ३३७ भारत नगर कळमना मार्केट रोड नागपुर याचे ताब्यातील बोलेरो गाडी क्र. एमएच ४० बी २७३९ ही संत्रा घेवुन मोहाडी कडुन गोदिंयाला जात असता मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन लापरवाहीने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन मागेहुन खरबी येथे धडक मारुन फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

३) दारूडया वाहन चालकावर कारवाई:-

दिनांक ०४/०३/२०१७ चे ०१.३० वा. दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील मारोती व्हॅन क्र. एमएच ३६ झेड ४८१७ चा चालकाने वाहन रस्त्याने आडवेतिडवे दारु पिऊन दारुचे नशेत एनएच ०६ रोडवर लाखनी येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचा ग्रा.रु. लाखनी येथे वैद्यकीय तपासनी केली असता डॉ. परीक्षण अहवाला वरुन पोस्टे लाखनी येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

४) लायसन्स न बाळगता दारूडया वाहन चालकावर कारवाई . :-

दिनांक ०४/०३/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच २६ एडब्लु १३२७ चा चालकान आपले ताब्यातील वाहन रस्त्याने आडवेतिडवे दारु पिऊन दारुचे नशेत लायसन्स न बाळगता तहसील फाटा पवनी येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचा ग्रा.रु. पवनी येथे वैद्यकीय तपासनी केली असता डॉ. परीक्षण अहवालां वरुन पोस्टे पवनी येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) दारूडया वाहन चालकावर कारवाई . :—**

दिनांक ०४/०३/२०१७ चे १०.३० ते १०.५५ वा. दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील टाटा मॅजीक क्र. एमएच ३६ एफ ८१६७ चा चालकाने वाहन दारु पिऊन दारुचे नशेत बस स्थानक भंडारा येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने पोस्टे भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०४/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ७६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

**सपोनि. के. एम.हत्तीमारे**
**जि. वि. शा भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.